**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक १५ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पुद्दुचेरीसह ४ राज्यातल्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर; राहुरी आणि बारामती मतदारसंघांसाठी २३ एप्रिलला मतदान.**
2. **कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेतीमध्ये वापर करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.**
3. **पीएनजी जोडणी धारकांनी एलपीजी जोडणी परत करावी असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचं आवाहन.**

**आणि**

4. **विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीची मतमोजणी सुरू; अध्यक्षपदासाठी पहिल्या फेरीपासून गिरीश गांधी आघाडीवर.**

**आता सविस्तर बातम्या .......**

निवडणुकीचा कार्यक्रम

आसाम, तमिळनाडू, केरळम, पश्चिम बंगाल आणि पुद्दुचेरीच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम आज केंद्रीय निवडणूक आयोगानं जाहीर केला. त्यानुसार आसाम, केरळम, आणि पुद्दुचेरी इथं ९ एप्रिल रोजी सार्वत्रिक मतदान होईल. पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यात २३ एप्रिल आणि २९ एप्रिलला मतदान होईल. त्याचप्रमाणे तामिळनाडू इथं २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. ४ मे रोजी सर्व निकाल जाहीर केले जातील. या पाचही ठिकाणच्या मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षणानंतर अंतिम मतदार याद्या निवडणूक आयोगान प्रसिद्ध केल्या आहेत. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, गुजरात, नागालँड आणि त्रिपुरामधल्या विधानसभेच्या ८ जागांसाठी पोटनिवडणुकाही निवडणूक आयोगानं जाहीर केल्या. त्यानुसार राहुरी आणि बारामती मतदारसंघांसाठी २३ एप्रिलला मतदान होईल. सर्व निवडणुकांची मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.

महाभियोग मागणी

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर महाभियोग चालवण्याच्या मागणीला समाजवादी पक्षाचा पाठिंबा असल्याचं पक्षाचे अध्यक्ष खासदार अखिलेश

यादव यांनी सांगितलं. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. ज्ञानेश कुमार हे कर्तव्याबाबत प्रामाणिक नसल्याचा आरोप यादव यांनी केला. विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या दोन्ही सभागृहामधे ज्ञानेश कुमार यांच्यावर महाभियोग चालवण्याची मागणी करणारी नोटीस दिली आहे. लोकसभेचे १३० आणि राज्यसभेच्या ६३ खासदारांनी यावर स्वाक्षरी केली आहे. ज्ञानेश कुमार हे विरोधी पक्षांसोबत भेदभाव करतात, सत्ताधारी पक्षाला नेहमी झुकतं माप देतात, सखोल पुनरीक्षणाच्या माध्यमातून त्यांनी लाखो लोकांना मतदानापासून वंचित ठेवलं असे आरोप विरोधी पक्षांनी केले आहेत. देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांवर महाभियोग चालवण्यासाठी नोटीस देण्याची ही देशाच्या इतिहासातली पहिलीच वेळ असल्याचं सांगितलं जात आहे.

मुख्यमंत्री

कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेतीमध्ये वापर करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असून या माध्यमातून शेतीचा उत्पादन खर्च हा २५% कमी झाला आहे, तर उत्पन्न मात्र वाढल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा ३९ वा पदवीदान समारंभात ते आज बोलत होते. राज्यामध्ये केलेली कर्जमाफी ही तात्पुरत्या स्वरूपाची उपाययोजना आहे मात्र शाश्वत शेतीचं दीर्घकालीन प्रारूप तयार करण्यात राज्य सरकार सह इतर संस्था आणि कृषी स्नातकांनी वाटा उचलावा असं आवाहन त्यांनी केलं....

***(होल्ड बाईट- मुख्यमंत्री - ३५ सेकंद)***

समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल जिष्णू देव वर्मा होते. त्यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मानद डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी देवून सन्मानीत करण्यात आलं. कृषी विद्यापीठाच्या स्नातकांनी, संशोधन, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि यावर भर द्यावा, असं आवाहन राज्यपालांनी केलं. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, कृषि मंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे उपस्थित होते. विविध विद्याशाखांतल्या एकूण ४ हजार ६०२ स्नातकांना या सोहळ्यात पदवी, पदव्युत्तर पदवी, आणि आचार्य पदवीने गौरवण्यात आलं.

पीएनजी पुरवठा

देशातल्या ज्या घरांमध्ये इंधनासाठी पीएनजी अर्थात पाईप द्वारे नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरु आहे, त्यांनी एलपीजी सिलिंडर वापरू नयेत आणि पीएनजी वापरणाऱ्या नागरिकांच्या नावावर सिलिंडर जोडण्या असल्यास त्यांनी त्या परत कराव्यात असं

सरकारन म्हटलं आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने काल याबाबतची अधिसूचना जारी केली. जिथे पाईप गॅस च्या जोडण्या नाहीत अथवा त्यासाठी काम सुरु आहे, अशा ठिकाणी या जोडण्या देण्याचं काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश मंत्रालयाने दिले आहेत. जिथे अद्याप पाईप गॅस पोचलेला नाही, तिथे एलपीजी सिलिंडर पुरवठा प्राधान्याने करता यावा यासाठी हा आदेश काढल्याचं मंत्रालयाने म्हटलं आहे. पश्चिम आशियातल्या संघर्षाचा इंधन आयातीवर विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे देशांतर्गत उत्पादित होणाऱ्या वायूचा वापर अधिक कार्यक्षम रीतीने करण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरु आहेत. **ऐकुया पश्चिम आशियातील घडामोडी संदर्भात हा वृत्तांत -**

***(व्हॉइस कास्ट - नम्रता)***

***भारताचा ध्वज असलेल्या 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' या दोन एलपीजीवाहू जहाजांनी काल होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार केली. ही जहाजं आज मुंद्रा आणि कांडला बंदरांवर पोहोचतील. ९२ हजार ७०० टन एलपीजी त्यातून आणला जात आहे. भारताच्या आणखी २२ जहाजांचा मार्ग मोकळा करण्याकरता प्रयत्न चालू असल्याचं नौवहन मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी काल नवी दिल्ली इथे आयोजित आंतर-मंत्रालयीन पत्रकार परिषदेत सांगितलं. दरम्यान, इराणवर क्षेपणास्त्र डागण्यासाठी संयुक्त अरब अमिराती जागा उपलब्ध करुन देत असल्याचा आरोप इराण ने केला आहे. इराणच्या खार्ग बेटावर आणि अबु मुसा शहरावर काल दुबईजवळच्या रास अल खैमा इथून क्षेपणास्त्र हल्ले झाल्याचा दावा इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी केला आहे. संयुक्त अरब अमिरातीतल्या रहिवाशांनी जेबेल अली, खलिफा आणि फुजैरा ही बंदरं तात्काळ रिकामी करावी असा इशारा इराणने जारी केला आहे. या बंदरांमधे अमेरिकेचे लष्करी तळ असून प्रत्युत्तरात त्यांचं नुकसान होण्याची शक्यता असल्याचं इराणने म्हटलं आहे. मात्र अराघची यांचे आरोप युएईने फेटाळले आहेत. तर दुसरीकडे इस्राएलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यात सुमारे ८०० जणांचा मृत्यू झाला, तर साडेआठ लाखापेक्षा जास्त विस्थापित झाले आहेत. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी नम्रता फलके)***

विदर्भ साहित्य संघ निवडणूक

विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीच्या मतमोजणीत गिरीश गांधी यांनी पहिल्या फेरीपासूनच मोठ्या फरकाने आघाडी घेतली आहे. मतमोजणीला आज नागपुरातील विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात सुरुवात झाली. २२ सभासदांसाठी ८३

उमेदवार रिंगणात असून अध्यक्ष पदासाठी ५ उमेदवार रिंगणात आहेत. तिसऱ्या फेरीनंतर गिरीश गांधी यांना २३०८ मते मिळाली असून प्रदीप दाते ९१८ मतांसह दुसऱ्या क्रमांकावर आहेत. डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी यांना ५५९, डॉ. रवींद्र शोभणे यांना १९१ तर डॉ. रंजन दारव्हेकर याना ९६ मते मिळाली आहेत. 4935 सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला असून सदस्य उमेदवारांच्या निवडणुकीचा निर्णय रात्री उशिरापर्यंत कळेल.

चिंतन शिबीर

केंद्रीय वस्त्र मंत्रालयाच्या वतीनं काल नागपूर इथं "कापसाची उत्पादकता दुप्पट करणे तसेच उच्च दर्जाच्या तंतूंची वाढ साध्य करण्यासाठी धोरणात्मक आराखडा" या विषयावर चिंतन शिबिराचं आयोजन करण्यात आलं. धोरणनिर्माते, वैज्ञानिक, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी तसच कृषी तज्ज्ञ यांनी या चिंतन शिबिरात सहभाग घेतला. कापसाची उत्पादकता वाढविण, तंतूंची गुणवत्ता सुधारण आणि जागतिक कापूस मूल्य साखळीत भारताचं स्थान अधिक बळकट करण यासाठी विविध धोरणात्मक उपक्रमांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

भारतीय कापूस महामंडळ

भारतीय कापूस महामंडळ-सी.सी.आय. राज्यात हमीभावाने कापसाची खरेदी आजपासून बंद करणार असल्याच्या पार्श्वभूमीवर याला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. कापूस अद्याप शिल्लक असल्यानं ही मागणी करण्यात आल्याचं नमूद करण्यात आलं आहे. पहिल्या टप्प्यातल्या एफएक्यू दर्जाचा कापूस संपल्याचा दावा करत सी.सी.आय.नं खरेदी बंद करत असल्याचं म्हटलं आहे.

शेफ विष्णू मनोहर

तृतीयपंथी समुदायाला रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशान शेफ विष्णू मनोहर यांच्या मार्गदर्शनात दिनांक 16, 17 आणि 18 मार्च दरम्यान निःशुल्क प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेला "विष्णुजी की रसोई", बजाज नगर, नागपूर इथं 16 तारखेला दुपारी 12 वाजता प्रारंभ होईल.

लोणार सरोवर

जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या जतन-संवर्धनासोबत पर्यटनविकासाला गती देण्याच्या दृष्टीन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंगल यांनी लोणार इथं प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीत त्यांनी लोणार विकास आराखड्यांतर्गत सुरू

असलेल्या कामांची सविस्तर माहिती घेत गुणवत्ता, पारदर्शकता आणि वेळेचे नियोजन यांवर भर देण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले.

हवामान

हवामान - नागपूरच्या कमाल तापमानात आज किंचितशी घट होऊन ते 36 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. दरम्यान अकोला जिल्हा काल संपूर्ण देशात सर्वाधिक उष्ण ठरला. अकोल्यात काल 41पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं होतं. आज देखील अमरावती, अकोला आणि वर्धा या जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. उद्या गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर आणि यवतमाळ इथं विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. 19 मार्च पर्यंत ही परिस्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे.

*****